१३ डिसेंबर २००७ भाग क्र. :— ३.

१८६. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई :—

विषय :— परमीटरूम रेस्टॉरंट, बिअरबार, नाट्यनिगृहाच्या हॉटेल आस्थापनांमध्ये पत्रक/परवानगीनी विहित परवाना प्राप्त करून वाद्यवृंद कार्यक्रम सादर करणारे स्त्री कलाकार रात्री ९.३० नंतर उपस्थित असल्यास शॉप्स अॅन्ड इस्टॅब्लिश कायदा, १९४८ मधील तरतूदीनुसार कारवाई न करण्याबाबत.

संदर्भ :— बिनतारी संदेश क्र. ६५३, दि. १३/१२/२००७

रिट याचिका क्र. ४१६८/२००७ व इतर ३१ याचिकांतील मा. उच्च न्यायालयाच्या द्वि खंडपीठासमोरील प्रकरणाच्या अनुषंगाने उपस्थित झालेल्या मुद्यानुसार सार्वजनिक मनोरंजन ठिकाण नियम १९६० मध्ये मुंबई शॉप्स् अॅन्ड इस्टॅब्लिश कायद्यामधील तरतुदींचा समावेश नसल्यामुळे मनोरंजनाच्या जागेचा व खेळाचा परवाना घेवून बार व परमीटरूम आस्थापनेत वाद्यवृंद कार्यक्रम सादर करणारे स्त्री गायिका (कलाकार) रात्री ९.३० नंतर उपस्थित असल्यास त्यांच्याविरूध्द कारवाई करण्यास पोलीसांना कायदेशीर मुभा नाही. याबाबत कार्यालयामार्फत मा. उच्च न्यायालयास प्रतिज्ञापत्र सादर करून दिलेल्या वचनानुसार मनोरंजनासाठीचा परवाना असे अशा बार व परमीटरूम चालविणाऱ्या हॉटेल्समध्ये वाद्यवृंद कार्यक्रम सादर करणाऱ्या स्त्री गायिकांना रात्री ९.३० नंतर उपस्थित राहण्यास शॉप्स् अॅन्ड इस्टॅब्लिश कायदा, १९४८ मधील कलम ३३ मधील तरतूदीनुसार पोलीस अधिकाऱ्यांकडून मज्जाव करण्यात येऊ नये व त्या अनुषंगाने कारवाई करण्यात येऊ नये. जेणेकरून मा. उच्च न्यायालयाचा कोणत्याही प्रकारे अवमान होणार नाही व न्यायालयीन समस्या उद्‌भवणार नाही याची काळजी घ्यावी. मात्र मनोरंजनाचे कार्यक्रम सादर करणाऱ्या स्त्री गायिकांखेरीज हॉटेल्समधील महिला वेटर्स यांचेबाबतीत रात्री ९.३० नंतर उपस्थित असल्यास कारवाई करता येईल.

तसेच स्पष्ट करण्यात येते की, वाद्यवृंदामध्ये काम करणारे स्त्री गायिका व अन्य कर्मचारी यांचेविरूध्द नियम भंग आढळल्यास मुंबई पोलीस कायदा, १९५१ मधील कलम ३३, ११० इत्यादी कलमातील तरतूदीनुसार कायदेशीर कारवाई करण्यास केव्हाही मुभा आहे. तसेच २९० भा.द.वि. व रिट. कायद्याचा भंग केल्याससुध्दा रितसर कारवाई कोणत्याही वेळी करण्यास मुभा आहे. सदरहू कलावंतांना पोलीस परवाना नियम तसेच जागेच्या व खेळाच्या परवान्याच्या नियम भंगानुसारही कारवाई करता येईल. तसेच नमूद करण्यात येते की, उक्त मुद्दा विचारात घेवून नियम भंगाबाबत हॉटेल आस्थापनेविरूध्द प्रचलित कायद्यातील तरतूदींनुसार रितसर कारवाई करण्यास प्रतिबंध नाही. मात्र नियम भंगाबाबत कारवाई करताना रितसर पंचनामा, साक्षीदाराचे जबाब, ग्राहकांचे जबाब इत्यादी अभिलेख तयार करावा.

तरी सर्व अपर पोलीस आयुक्त, प्रादेशिक विभाग, सर्व परिमंडळीय पोलीस उप आयुक्त, सर्व विभागीय सहाय्यक पोलीस आयुक्त, सर्व पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक आणि वरिष्ठ पोलीस निरीक्षक, समाजसेवा शाखा व सर्व संबंधीतांनी याबाबत नोंद घेवून उपरोक्त सूचनांचे काटेकोर पालन करावे.

.......................................................................